लोक अदालतीसमोर भूसंदर्भ
तडजोडीसाठी सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/PIL-३४/प्र.क्र.१०४/भाग-१/अ-४.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ०३ एप्रिल,२०१८

<u>वाचा</u>- (१) शासन निर्णय क्र.एलक्यूएन ०१/२०१८/प्रक्र.३०/अ-२, दिनांक १३ ऑक्टोबर,२०११.
(२) शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन ०१/२०१८/प्रक्र.३०/अ-२, दिनांक १७ डिसेंबर,२०११.
(३) शासन शुध्दीपत्रक क्र.एलक्यूएन ०१/२०१८/प्रक्र.३०/अ-२, दिनांक १८ फेब्रुवारी,२०१२.
(४) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४ /प्र.क्र.४१/भाग-१/अ-४, दि. ३ नोव्हेंबर, २०१६ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दि २३.०२.२०१७ व दि. ४.०५.२०१७

प्रस्तावना :-

मा.लोक अदालतीसमोर तडजोडीसाठी भूसंदर्भ सादर करुन जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार तडजोड करण्यासाठी वरील शासन निर्णय / परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच, संदर्भाधिन क्र.४ च्या शासन निर्णयानुसार दिवाणी न्यायालयातील कलम १८ खालील भूसंदर्भामध्ये मा. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द वरीष्ठ न्यायालयात अपिलाबाबतच्य कार्यवाहीचे निकष निश्चित करून सदर निकषानुसार मा. दिवाणी न्यायालय व मा. उच्च न्यायालयामध्ये निर्णयासाठी प्रलंबित असलेली प्रकरणे संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतुदीनुसार लोक अदालतीसमोर सादर करण्यात यावीत व त्यामध्ये जास्तीत जास्त प्रकरणांमध्ये तडजोड करून प्रकरणे निकाली काढण्यात यावीत अशा सुचना दिलेल्या आहेत.

तथापि, मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.३४/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि. ११ सप्टेंबर, २०१७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये शासनाने लोक अदालतीसमोर जास्तीत जास्त प्रकरणे घेऊन त्यामध्ये तडजोड करण्यासाठी आवश्यक ते आदेश निर्गमित केलेले आहेत, परंतु संबंधित संपादक संस्था यामध्ये गंभीरतेने कार्यवाही करीत नसल्यामुळे लोक अदालतीसमोर जास्तीत जास्त प्रकरणे घेऊन तडजोड करण्याची कार्यवाही केली जात नाही. तसेच ज्या प्रकरणांमध्ये तडजोड करण्यात आलेली आहे, त्या प्रकरणांमध्ये आवश्यक तो निधी विहित कालावधीत उपलब्ध करुन दिला जात नाही, असा निष्कर्ष नोंदविण्यात आलेला आहे. सदर जनहित याचिकेच्या दिनांक १.०३.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान भूसंपादन प्रक्रिया व मोबदला वाटप प्रक्रिया या संदर्भात उहापोह झाला.त्याअनुषंगाने सर्वंकष विचार करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक:-

मा. दिवाणी न्यायालयासमोर निर्णयासाठी प्रलंबित असलेले सर्व भूसंदर्भाची संदर्भाधिन क्र. ४ चे निर्णयामधील निकषानुसार प्रत्यक्ष तपासणी करून सदर निकषानुसार तडजोड करणे योग्य भूसंदर्भ संबंधित संपादक संस्था यांनी मा.लोक अदालतीसमोर त्वरीत सादर करुन त्यामध्ये तडजोड घडवून आणण्याची कार्यवाही दक्षतेने करण्यात यावी. ज्यायोगे १५ % व्याजाचा भूर्दंड शासनावर पडून त्याचा बोजा शासन तिजोरीवर येणार नाही, याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. याबाबत संबंधित भूसंपादन संस्थेने संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यास प्राधिकृत करून सदर निकषाचे काटेकोरपणे पालन हाईल असे पहावे.

तसेच, मा.लोक अदालतीसमोर तडजोड करण्यात आलेल्या प्रकरणाशी निगडित निधी संबंधीत संपादक संस्था यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे सहा महिन्याचे विहित कालावधीत भरणा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. विहित कालावधीत निधीचा भरणा न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित भूसंपादन संस्थेवर /प्रशासकीय विभागावर राहील.

तरी सर्व प्रशासकीय विभाग / संपादक संस्था यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय अधिका-यांच्या निदर्शनास आणण्याची विनाविलंब कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०४०३१६४००३८११९ असा आहे.सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Asha Shailesh Dahake

Digitally signed by Asha Shailesh Dahake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bdc3a70507686db48462c677bbbc5032947f8b7f5be3fb7ff1eaf137f7771f4b, cn=Asha Shailesh Dahake
Date: 2018.04.03 16:40:58 +05'30'

(आशा डहाके)

सहायक संचालक नगर रचना तथा अवर सचिव,

महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव , मंत्रालय, मुंबई.
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) सर्व जिल्हा सरकारी वकील.
१२) निवडनस्ती (अ-४)
१३) कार्यासन अ-१, अ-२,अ-३,अ-४.